माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२३/M/००२९१४**

**अपिलार्थी श्री. रोहिदास हिराजी पाटील**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी, श्रेणी- १**
सहकार कक्ष, झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पू), मुंबई-५१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक (पूर्व व पश्चिम उपनगरे)**
झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पू), मुंबई-५१

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २४.०३.२०२५**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २५.०४.२०२३ | - | ३०.०५.२०२३ | ३०.०८.२०२३ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०३.१०.२०२३ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. ३०.०८.२०२३ संलग्न केले आहेत.

आजच्या सुनावणीस अपिलार्थी उपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे कार्यालयात दुरध्वनीद्वारे कळविले आहे की, त्यांचे आईची तब्येत अचानक बिघडल्यामुळे ते आजच्या सुनावणीस उपस्थित राहू शकणार नाहीत. सुनावणीची पुढील तारीख मिळा, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

**या प्रकरणी दिनांक २१.०४.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता सुनावणी घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : २५.०३.२०२५**

प्रदीप व्यास 25-3-2025

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**अपील क्र. MHSICMU/२०२३/M/००२९१४**
**अपिलार्थी श्री. रोहिदास हि. पाटील**
**सुनावणी दिनांक : २१.०४.२०२५ (In continuation of order dt. २५.०३.२०२५)**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे कार्यालयात दूरध्वनीद्वारे कळविले आहे की, त्यांचे आईची तब्येत अचानक बिघडल्यामुळे ते आजच्या सुनावणीस उपस्थित राहू शकणार नाहीत. सुनावणीची पुढील तारीख मिळावी अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे. जन माहिती अधिकारी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे असे आदेशित केले होते.

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी दि. २५.०४.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार दि. १६.०२.२०२३ रोजी केलेल्या तक्रारीवर करण्यात आलेल्या कार्यवाहीची व सहकार कक्षाने काढलेल्या दि.१८.०९.२०१९ रोजीच्या नोटीसवर केलेल्या कार्यवाहीची माहिती विचारलेली होती. जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही उत्तर न दिल्याने अपिलार्थी यांनी दि. ३०.०५.२०२३ रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.०८.२०२३ रोजी अपिलार्थी यांना अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती देण्यात यावी असे आदेश देऊन अपिल निकाली काढलेले आहे.

अपिलार्थी यांनी दि. ०३.१०.२०२३ रोजी योग्य माहिती मिळालेली नाही असे नमूद करुन द्वितीय अपिल दाखल केले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी दि. १७.०४.२०२५ रोजीचे लेखी निवेदन आयोगासमोर सादर करुन असे नमूद केले की, "*अर्जदार यांच्याकडील दि.१६.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये विक्टर शेल्टर (मायकलवाडी भिमनगर) कांदरपाडा, दहिसर, मुंबई – ६८ ही संस्था एमयुएम/एसआरए/एचएसजी/टीसी/१३३७०/सन२०२२, दि. १२.१२.२०२२ नुसार नोंदविण्यात आलेली आहे, परंतु सदर वेळी सादर केलेल्या कागदपत्रावर बऱ्याच सभासदांच्या बोगस हस्ताक्षर (सह्या) / खोटया असलेबाबत तक्रार दाखल केलेली आहे. सदर अर्जावर या कार्यालयाकडून कार्यवाही केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही.*

*परंतु सदर अपिलार्थी यांनी उपरोक्तप्रमाणे दाखल केलेल्या तक्रारीतील नोंदणीच्या कादगपत्रांवर खोटया / बोगस सह्या असलेबाबत दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यास्तव संबंधितांनी झालेल्या नोंदणी प्रस्तावावर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४ अपील दाखल करुन दाद मागणे अपेक्षित होते.*

*तसेच सदरहू संस्थेची नोंदणी धारिका या कार्यालयात उपलब्ध असून सदर नोंदणी धारिकेतील कागदपत्रे अर्जदार यांनी या कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून प्राप्त करुन घेतल्याची नोंद घ्यावी. तसेच सदरहू संस्थेच्या सदनिकांची तपासणी करणेबाबत अर्जदार यांनी या कार्यालयास विनंती केलेली आहे.*

..२/-

*तत्कालीन कालावधीमध्ये सदर संस्थेतील सदनिकांची तपासणी करण्यास्ताव संबंधित श्री. सुनिल धोंडगे – क्षेत्रिय अधिकारी यांनी संस्थेतील सदनिकांची तपासणी केल्याचे दिसून येते, परंतु त्याबाबतचा कोणताही अहवाल या कार्यालयास सादर केल्याचे दिसून येत नाही."*

जन माहिती अधिकारी यांच्या दि. १७.०४.२०२५ रोजीच्या निवेदनाची प्रत अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिली व ती त्यांनी स्विकारली.

जन माहिती अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या तरतूदीनुसार वस्तुस्थितीदर्शक उत्तर अपिलार्थी यांना आदेशप्राप्तीच्या ७ दिवसात नोंदणीकृत टपालाने कळविण्यात यावे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : २२.०४.२०२५**

State Information Commission * Greater Mumbai *

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**